# महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर मार्फत राज्यातील नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना पोलीस भरती पुर्व परीक्षा -2023

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील 12 वी उत्तीर्ण असणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**योजनेचे स्वरुप :-**

पोलीस भरती पुर्व प्रशिक्षणासाठी पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मोफत ऑफलाईन व ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येते.

**प्रशिक्षणाचा कालावधी** :- 4 महिनेकरीता

**विद्यावेतन** :- रु.6000/- प्रती उमेदवार (ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता)

प्रशिक्षणार्थी संख्या :- 400

**योजनेच्या लाभासाठी पात्रता :-**

तसेच उमेदवार हा 12 वी उत्तीर्ण असावा तसेच नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील असावा/असावी.

**अर्ज कसा करावा ?**

1. महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील Notice Board मधील पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण 2023 या टॅबवर जाऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा
2. अर्जासोबत ओळखपत्र, जातीचा दाखला, वैध नॉन क्रिमीलेअर दाखला, 12 वी उत्तीर्ण प्रमाणपत्र (गुणपत्रिका), आधार कार्ड, बँक पासबूक इत्यादी कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील. सदर कागदपत्रे स्व-साक्षांकित करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावेत.

**आरक्षण :-**

1. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील 30% जागा महिल्यांसाठी आरक्षित आहे.

**सामाजिक प्रवर्गनिहाय विभागणी**

| अ.क्र. | प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | इतर मागासवर्ग | 59% |
| 2 | विमुक्त जाती - भटक्या जमाती | 35%<br>निरधीसुचित जमाती (अ) - 10%<br>भटक्या जमाती (ब) - 8%<br>भटक्या जमाती (क) - 11%<br>भटक्या जमाती (ड) - 6% |
| 3 | विशेष मागास प्रवर्ग | 6% |

**अटी व शर्ती :-**

1. अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक 25 जानेवारी 2023 आहे.
2. विहित नमुन्यामध्ये कागदपत्रांसहित अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची छाननी परीक्षा घेऊन प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.
3. प्रशिक्षणाकरिता निवड झालेले उमेदवार ज्या दिनांकास रुजू होतील त्या दिवसापासून त्यांना रु.6000/- प्रती महिना या दराने विद्यावेतन लागू होईल. प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्या उमेदवारांनाच विद्यावेतन देण्यात येईल.
4. उमेदवारांनी विद्यावेतन जमा करण्यासाठी आधार क्रमांकाशी संलग्न बँक खाते देणे अनिवार्य आहे.
5. महाज्योती कडे अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सारथी, पुणे या संस्थेकडील याच परीक्षेच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नसावा. तसेच महाज्योती कडील सदर प्रशिक्षणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रशिक्षण योजनेत अधिछात्रवृत्तीचा लाभ धारक नसावा. उमेदवाराने अशा प्रकारचा दुबार लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराविरुद्ध नियमाप्रमाणे कारवाही करण्यात येईल.
6. सदर प्रशिक्षणासाठी अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने वरील अटी व शर्तीचा भंग केल्याचे तसेच चुकीची किंवा खोटी कागदपत्रे/ महिती सादर केल्यास त्यांचेवर झालेल्या प्रशिक्षण खर्चाची त्यांचेकडून वसुली करण्यात यईल व यापुढे महाज्योतीच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेण्यास ते पात्र असणार नाही.
7. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांना असतील.
8. पोस्टाने किंवा ईमेल द्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
9. अर्ज भरताना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या कॉल सेंटर वर पुढील क्रमांकावर सकाळी 10.00 ते सांयकाळी 6.00 या वेळात संपर्क करावा. संपर्क क्रमांक :- 8956775376, 8956775377, 8956775378, 8956775379, 895677538

व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर